**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **बी-बियाणे उद्योगाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करावा; आशियाई बी-बियाणे परिषदेत केंद्रीय कृषीमंत्र्याचं आवाहन.**
2. **नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी सर्व पक्षांकडून शक्तिप्रदर्शन.**
3. **महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संघटित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचं राज्यपालांचं प्रतिपादन.**
4. **सौदी अरेबियात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४० भारतीयांचा बस अपघातात मृत्यू.**
5. **विदर्भात थंडीची लाट; यवतमाळ इथं नऊ पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद.**

---

कृषीमंत्री

पारंपरिक बी-बियाणांच्या संवर्धनाच्या आवश्यकतेवर भर देण्याची गरज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. चौहान यांच्या हस्ते आज मुंबईत आशियाई बियाणे परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते.निकृष्ट आणि अनधिकृत बीज विक्री नियंत्रणासाठी आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बी बियाणे कायदा आणण्यात येणार असल्याचं चौहान यांनी सांगितलं. तसच महाराष्ट्रात बागायती पिकांना गुणवत्तापूर्ण रोपसामग्री मिळावी यासाठी तीन क्लीन प्लांट सेंटर स्थापन केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण बीज उपलब्धतेची गरज व्यक्त करत कृषिमंत्र्यांनी  बी बियाणे उद्योगान शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करावा, असं आवाहन केलं. तर राज्यात पुढील दोन ते तीन वर्षांत 25 लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणण्याचा शासनाचा संकल्प आहे. यासाठी बी-बियाणे उत्पादक कंपन्यानी नैसर्गिक शेतीस अनुरूप वानांची निर्मिती करण, ही काळाची मागणी आहे.

बी बियाणे उत्पादक कंपन्यांनी  नवकल्पना दिल्यास आपण शाश्वततेकडे जाऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला..........

***(होल्ड बाईट- फडणवीस - २७ सेकंद)***

***We all know in today's climate change era, the worst hit is agriculture. In country like India, we can see that we need to bring more and more sustainability into agriculture and to bring the sustainability, we need more and more innovation. We need more resilient varieties. As right have told by the minister that today climate resilient agriculture is the need of the day.***

उदघाटन समारंभानंतर कृषी मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी कार्यक्रमस्थळी सुरु असलेल्या विविध स्टॉल्सना भेट दिली. विविध देशांतील प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित आहेत.

-------------------------------------------

बीजोत्पादन

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत विदर्भातील अडीच हजार हेक्टर क्षेत्रावर यंदा ४० हजार क्विंटल बीजोत्पादन होणार आहे. त्यामध्ये सोयाबीन, तूर, उडीद, मूग आणि आंबा या पिकाच्या उत्पादनाचा समावेश आहे. त्या अनुषंगान आतापर्यंत १४ हजार क्विंटल सोयाबीनचे बीजोत्पादन झालं असून, सद्यस्थितीत फुलोऱ्यावर असलेल्या तुर पिकाचे उत्पादन लवकरच तयार होणार आहे.

-------------------------------------------

उमेदवारी अंतिम दिवस

राज्यात नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या, मंगळवारी अर्जांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केल्यानंतर १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान ज्या प्रभाग किंवा अर्जावर अपिल आहे असे सोडून इतर ठिकाणी अर्ज मागे घेता येतील. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे.

-------------------------------------------

विदर्भ उमेदवारी अर्ज

विदर्भात आज अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वत्र शक्ती प्रदर्शन करत अर्ज भरले गेले. भंडारा  जिल्ह्यात  भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस यांच्याकडून उमेदवारी अर्ज भरण्यात आले. यात भंडारा शहरात विविध

पक्षाकडून मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन केलं जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं. दरम्यान, महाराष्ट्रामध्ये सरकारच्या विरोधात असंतोष असल्यामुळे महाविकास आघाडीचे जास्तीत जास्त सदस्य निवडून येतील असा विश्वास काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केला ........

***(होल्ड बाईट - पटोले- २५ सेकंद)***

***आज भंडारा शहरामध्ये जे आज सत्तेमध्ये आहे. या सगळ्यांचा भ्रष्टाचार हा जनतेच्या लक्षात आहे आणि भंडाराची दुर्दशा गेल्या 10 वर्षांत या तिघांनी मिळून जे केलेली आहे ते भंडारा शहराच्या जनतेला समजलेली आहे. सगळ्या घटकांचा लोकांनी आणि भंडारा शहरातील जनतेचा आशीर्वाद, काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यासोबत आपल्याला पाहायला मिळणार आहे.***

गोंदिया नगर परिषदेत भारतीय जनता पक्षाच्या वतीन कशिश जैस्वाल, शिवसेने शिंदे गटाच्या वतीन डॉ. प्रशांत कटरे तर, भारतीय काँग्रेसच्या वतीन सचिन शेंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीन डॉ माधुरी नासरे यांना उमदेवारी जाहीर झाली आहे. या पक्षांकडून आज शेवटच्या दिवशी शक्ती प्रदर्शन करीत नामांकन अर्ज दाखल करण्यात आले.

-------------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

कामठी नगरपरिषदेसह राज्यातील सर्व नगरपालिकांमध्ये महायुती एकसंधपणे आणि ताकदीन मैदानात उतरली असून, "जनता विकासाला मत देणार आहे, धर्मपंथापलीकडे जाऊन मतदान होईल," असा विश्वास महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. कामठी येथे प्रसारमाध्यमांशी ते संवाद साधत होते. कामठीमध्ये नगराध्यक्ष अजय अग्रवाल यांच्यासह सर्व नगरसेवकांनी महायुतीतर्फे अर्ज भरले असून, महायुतीला किमान ५१ टक्के मते मिळणार असल्यान आमचा विजय निश्चित असल्याचं त्यांनी सांगितलं. विदर्भातील अनेक ठिकाणी महायुतीची युती झाली आहे. काही ठिकाणी मित्रपक्ष म्हणून आम्ही लढत असल्याचं बावनकुळे म्हणाले.

-------------------------------------------

राज्यपाल आचार्य देवव्रत

महाराष्ट्राच्या शिक्षणव्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाशी थेट जोडलेली अशी टास्क फोर्स स्थापन करून ती दर पंधरवड्याला प्रगती अहवाल सादर करेल

अशी प्रणाली निर्माण करावी, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. राजभवन इथं 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि व्हिजन महाराष्ट्र २०४७' या विषयावर कार्यशाळेच आयोजन करण्यात आलं होत, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी तसच राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.

---------------------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

मेळघाट सारख्या वनवासी क्षेत्रात असणारी वनसंपदा, आदिवासी संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातून शाश्वत तसंच सर्वांगीण विकास करणे हेच सरकारचे मुख्य ध्येय असल्याच प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केल. 'संपूर्ण बांबू केंद्र मेळघाट' च्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त ग्रामीण ज्ञानपीठ इथं ग्राम ज्ञानपीठ संग्रहालयाच भूमिपूजन आणि राष्ट्रीय कौशल्य विकास निगम दिल्ली प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षित कारागिराचे एकत्रीकरण कार्यक्रमाचं आयोजन आज ग्रामन ज्ञानपीठ इथं करण्यात आल होत.

---------------------------------------------

चाणक्य संरक्षण संवाद २०२५

जम्मू-काश्मीर मधल्या दहशतवादी कारवायांमध्ये लक्षणीय घट झाल्याचा दावा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केला आहे. नवी दिल्लीत चाणक्य संरक्षण संवाद २०२५ च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या वर्षी आतापर्यंत ३१ दहशतवादी ठार झाले असून त्यापैकी ६१ टक्के दहशतवादी पाकिस्तानी होते, असंही ते यावेळी म्हणाले.

---------------------------------------------

मदिना अपघात

सौदी अरेबियामधल्या मक्का शहरातून मदिनाकडे जाणारी प्रवासी बस डिझेल टँकरवर धडकल्यानं झालेल्या अपघातात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४० भारतीयांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये महिला आणि बालकांचाही समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटूंबियांप्रति शोक व्यक्त केला आहे. अपघातग्रस्तांबाबत माहिती मिळवण्यासाठी ८००२४ ४०००३ किंवा ०१२२६ १४०९३

किंवा ०१२६६ १४२७६  तसंच ०५५६१ २२३०१ या क्रमांकावरून नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल.

-------------------------------------------

शेख हसीना

बांगलादेशाच्या न्यायालयान माजी पंतप्रधान शेख हसिना यांना आज फाशीची शिक्षा सुनावली. गेल्या वर्षी जुलै महिन्यात झालेल्या हिंसाचाराबद्दल त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे.  दरम्यान, शेख हसिना यांनी खटल्याच्या सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी बांगलादेशात परतायला नकार दिला असून सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

-------------------------------------------

परीक्षा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - 2025 लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, तथापि 1 ते 3 डिसेंबर, दरम्यान  राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या होणा-या निवडणुकांमुळे 1 ते 3 डिसेंबर दरम्यानच्या सर्व लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याचं विद्यापीठ प्रशासनाद्वारे कळविण्यात आलं आहे.

-------------------------------------------

हवामान

विदर्भात सातत्यान तापमानात घट होत आहे. आज विदर्भात सर्वात कमी किमान तापमान यवतमाळ इथं  नऊ पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.  त्या पाठोपाठ गोंदिया आणि भंडारा इथं दहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. तर वाशीम इथं  10 पूर्णांक 4 आणि नागपूर आणि अमरावती इथं आज  दहा पूर्णांक पाच इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. आज गोंदिया जिल्ह्यामध्ये थंडीच्या लाटेचा इशारा प्रादेशिक हवामान विभागान जारी केला आहे.

-------------------------------------------